**दिवस ः १ . . . . . . . . . . . . . . . . लबाड जीभ ः भाग १**

**नीतीसुत्रे १२ ः २२**

लबाडी परमेश्वराशी व इतरांशी आपले संबंध बिघडवते . लबाडी आपल्यात असुरक्षितता निर्माण करते . आपण आत्मविश्वास गमवतो . लबाड जिव्हेचा परमेश्वराला वीट येतो . लबाडी वेगवेगळया प्रकारची आहे . कपट, अर्धसत्य, अतिशयोक्तीने बोलणे, खोटी स्तुति करणे .

**कपट ः १ ले पेत्र ३ ः १0**

पेत्र सावधान करतो की कपटी जिव्हा आपले चांगले दिवस कमी करून वाइट दिवस आणते . आठवण करा की याकोबाने (त्याच्या नावाचा अर्थ धोखा देणारा) एसावाला कसे फसवले . कशाप्रकारे त्याने व त्याच्या आईने संगनमताने एसावाचा मोठया भावाचा हक्क मिळवण्यासाठी आपल्या बापाला फसवले . एसावाचा वेष धारण करून त्याने आपल्या भावाचा आर्शिवाद मिळवण्यासाठी आपला बाप इसहाकाला फसवले . नंतर जेंव्हा एसावाला हे कपट समजले तेंव्हा त्याच्यात क्रोध व कडुपणा निर्माण होऊन याकोबाला ठार मारण्याची इच्छा झाली . याकोबाला दूरदेशी आपल्या मामाच्या देशी जाऊन काम करावे लागले . ही कथा अशीच पुढे जाते व आपण पाहतो की याकोबाला त्याच्या मामाने अनेकदा फसवले . जीवन दुखःदायी होते व चांगले दिवस जास्त काळ टिकले नाहीत .

**स्तोत्रसंहिता ५५ ः २३**

आपल्याला आज कोणती गोष्ट कपटी बनवते? आपण कपटी होऊ शकतो जर आपण देवावर भरवसा नाही ठेवला .

**अर्धसत्य**

प्रामाणिकपणा हा शब्द गणितातील 'पूर्तता' ह्या शब्दापासून आला आहे याचा अर्थ एखादया संखेचा काही भाग न घेता एक पूर्ण संख्या . प्रामाणिकपणा म्हणजे थोडेसे किंवा अर्धसत्य न सांगता पूर्ण सत्य सांगणे .

जर आपण शाळेचा किंवा ऑफिसला उशीरा गेलो तर आपल्या प्रामाणिकपणाची परीक्षा असते . मी किल्ल्या शोधत होते, ...बस, रिक्षाला उशीर झाला, वाहतूकीची कोंडी होती ........ किंवा घरी यायला उशीर झाला तर आपण सांगतो मी मित्रांबरोबर होतो, विशेष क्लास होता, इ . मी स्वतःला हा विश्वास देतो की मी अर्धसत्य बोलले म्हणजे मी बरोबर असतो . ह्याचा अर्थ असा पण आहे की आपल्या चूका दुसयांवर लादणे .

**ईयोब २७ ः ५**

आपण " सत्य. पूर्ण सत्य आणि सत्याशिवाय काहीच न बोलणे ." ही एक मोठी गोष्ट आहे .

**दिवस ः २ . . . . . . . . . . . . . . . . . लबाड जीभ ः भाग २**

इतरांचे लक्ष वेधून घेण्यासाठी एखादी गोष्ट फुगवून सांगणे ही सर्वसाधारण गोष्ट आहे . ही गोष्ट नुकसानकारक वाटत नसली तरी पण तो एक लबाडीचाच भाग आहे . असे बोलण्याची ज्या व्यक्तीला सवय आहे तो कालांतराने आपली प्रतिष्ठा गमावतो व त्याच्या बोलण्यावर लोक विश्वास ठेवत नाहीत . 'लांडगा आला रे आला' म्हणणा-या मुलाची गोष्ट तुम्हाला माहित असेल की खरच लांडगा आल्यावर त्याच्यावर कोणी विश्वास टेवला नाही . कोणी त्याला वाचवायला नाही

आले .

**प्रकटीकरण २१ ः ८**

अशा प्रकारे लबाडी करण्याची आपल्याला आकर्षण होऊ शकते . परंतु परमेश्वराने अशी लबाडी करण्या-यांचे काय होणार ते ठरवले आहे .

**नीतीसुत्रे ८ ः ७ ते ८**

**खोटी स्तुति करणे .**

एखादी गोष्ट फुगवून सांगणे हे स्वतःशी निगडीत असते परंतु खोटी स्तुति करणे इतरांशी निगडीत असलेली कृती आहे .

**यहुदा १ ः १९**

खोटी स्तुति करणे म्हणजे इतरांची पसंती मिळवणे . इतरांची योग्यता नसताना खोटी स्तुति करणे .

**स्तोत्रसंहिता ५ ः १२**

परमेश्वराच्या लेकरांनी असे वागू नये . परमेश्वराने एस्तरला पसंत केले व ती परशियाची रानी झाली . परमेश्वराने दानियलाला पसंत केले व त्याने अशुध्द अन्न न खाण्याबद्दल राज्याच्या अधिका-यांची परवानगी मिळवली . परमेश्वराने योसेफाला पसंती दिली व तो फारो नंतर देशाचा प्रमुख झाला . परमेश्वराचे मुल स्वत ःचे कौशल्य न वापरता देवावर अवलंबून राहते .

लक्षात ठेवा की तुंम्ही फक्त सर्वसाधारण लोकांचीच खोटी स्तुति करू शकता . ज्यांना माहित आहे की आपण काय करतो अशा लोकांची आपण खोटी स्तुति करू शकत नाही .

खोटी स्तुति आपल्यामध्ये नकारात्मक भावना निर्माण करते .ज्यावेळेस आपल्याला वाटते की आपल्याकडे दुर्लक्ष केले,आपली कदर केली नाही, किंवा आपल्याकडे कोणी आकर्षित नाही, तसेच अशा इतर नकारात्मक भावना ज्या सैतानाकडून असतात जेंव्हा आपल्या जीवनात असतात तेंव्हा खोटी स्तुति आपल्या जीवनात प्रवेश करते .हेच इतरांचे बाबतीत असते .भावनिक दृष्ठया मजबूत लोक खरी स्तुति मान्य करतात .

आणखी लक्षात ठेवा की लोक आपल्या चुका लपवण्यासाठी, अपयशावर पांघरून घालण्यासाठी आणि आपल्या अयोग्यतेत लाभ मिळवण्यासाठी खोटया स्तुतिचा उपयोग करतात .

**स्तोत्रसंहिता १२ ः ३**

**ईयोब ३२ ः २१ ते २२**

**दिवस ः ३ . . . . . . . . . .कावेबाज जीभ ः लोकांसमोर स्वत ःला लबाडीने प्रस्तुत करणे**

**शास्ते १९ ः १५**

शमशोन परमेश्वराने निवडलेला मनुष्य होता .तो एक वीर योध्दा होता .पलिश्ती लोकांच्या कूरतेतून इस्त्राएल लोकांना सोडवण्यासाठी परमेश्वराने त्याला निवडले होते .परमेश्वराने शमशोनाला अलौकिक शारीरीक सामर्थ्य व क्षमता दिली होती .

त्याच्या लांब केसांमध्ये त्याच्या शक्तीचे रहस्य होते.

शमशोन जेंव्हा एका लोभी व कपटी पलिश्ती दलिला नावाच्या स्त्रीच्या मोहात पडला तेंव्हा त्याचा अधःपाताला सुरूवात झाली.

अनेक लबाड प्रयत्यानी तीने शमशोनाच्या शारीरीक सामर्थ्याचे रहस्य उघड केले. तीने त्याचे केस कापून परमेश्वराने दिलेली त्याची शक्ती नाहीशी केली.

कावेबाजपणा म्हणजे कपटीपणाने जीभेचा वापर करणे. त्याचे परिणाम मोठे असतात. लक्षात ठेवा की सैतानाने कशाप्रकारे आपल्या कपटी शब्दाने हवेला परमेश्वराची आज्ञा मोडायला भाग पाडले.

कपटी बोलणारे प्रत्येक वेळेस त्यांच्या सफलतेवरउत्साहित होतात परंतु शेवटी सर्व प्रतिष्ठा ते गमावतात.

जे लोक येशूला आपल्या कपटी शब्दांनी रोम राज्या विरूध्द बोलण्यासाठी भडकवत होते त्यांचा येशूने सामना केला. त्यांनी येशूची स्तुती केली व शेवटी विचारले कि कैसरला कर देणे कायदयाने योग्य आहे की नाही ?

**(लुक २० ः २२ ते २३).** येशूने त्यांना विचारले " तुम्ही माझी परीक्षा का घेता " त्याने आपल्या ज्ञानाने त्यांच्या कपटीपणाला लज्जीत केले.

आपण हे कधीच वाचले नाही की येशूने अशा कपटीपणाचा उपयोग केला. मृत्यूला तोंड देताना देखील त्याने असे केले नाही. सर्वदा सत्य बोलला. देवाची लेकरे या नात्याने या आपण अशा प्रकारे वागू नये व असे वागणे खपवून घेऊ नये. असा निश्चय करू.

**दिवस ः ४ . . . . . . . . . . . . . . . . . . उतावली जीभ**

**नितीसूत्रे २९ ः २०**

आपण कधी विचार न करता काही बोलला व नंतर त्याबद्दल आपल्याला पसतावा झाला असे कधी घडले का? आपण कितीही निर्दोष असलो तरी आपल्या उतावळया बोलण्याने आपण इतरांना दुखावतो.

**याकोब ३ ः २**

म्हणून परमेश्वराने आपल्याला दोन कान व एक तोंड दिले.

तणावमुक्त होण्यासाठी तुम्ही एखादा विनोद करत असाल. एखादयाचे दुःख दुर करण्यासाठी काहीतरी तुंम्ही बोलत असाल. परंतु शेवटी दुःख अधिक वाढवले जाते.

**नितीसूत्रे १८ ः १३**

समोरच्या व्यक्तीचे बोलणे संपायच्या आत प्रतिकिया देऊन तुंम्ही खरा मुद्दा बाजूला ठेवता का.

**उपदेशक ५ ः २**

शलमोन आपल्याला प्रभुविरूध्द अशी प्रतिक्रिया देण्याबद्दल सावधान करतो. घाईमध्ये काहीतरी बोलून नंतर ती आपली चूक होती असे म्हणून आपण त्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही.

आपल्याला माहित आहे कि इफ्ताहाने परमेश्वरासमोर उतावळेपणाने नवस केला

**(शास्ते ११ ः ३० ते ४०)**

अगोदर काढलेले शब्द काहीवेळा नंतर गिळावे लागतात म्हणून ते मधूर असू द्या. "थांबा , विचार करा व बोलण्याआधी प्रार्थना करा" म्हणजे तुंम्ही चूकणार नाही.

**याकोब १ ः १९**

शब्द हे वेळेप्रमाणे असतात.जी एकदा गेल्यावर परत येत नाही.एकदा शब्द उच्चारल्यावर परत घेता येत नाही.बोलण्याआधी आपल्या शब्दांचा विचार करा.

**दिवस ः ५ . . . . . . . . . . . . . . . .फुट पाडणारी जीभ**

**मत्तय ५ ः ९**

फुट पाडून राज्य करण्याचे सैतानाचे एक मानवाविरूध्द एक परिणामकारक शस्त्र आहे.आपले कुटूंब असो किंवा मंडळी दोन किंवा अधिक लोकांनी केलेले श्रम वाया जातात.सैतानाला माहित आहे कि दोन व्यक्ती सहमत होतात तेंव्हा ते परिणामकारक ठरतात. **(मत्तय १८ ः १९).** ही एक दुखाःची गोष्ट आहे कि काही लोक शांतता भंग करणारे असतात.प्रश्न हा आहे कि तुंम्ही असे आहात काय?

**नितीसुत्रे ६ ः १९**

सांगते की सात गोष्टीचा परमेश्वराला वीट आहे.त्यातील एक गोष्ट म्हणजे असा मनुष्य जो भावा भावात वैर लावतो.

**इफिस ४ ः ३**

पवित्र आत्माच्या एकतेने शांती राखण्याची प्रेषित पॉल मंडळीला विनंती करतो. शांती राखण्यासाठी खुप प्रयत्न नम्रता व धार्मितेची गरज असते.शांततेसाठी स्पष्टता असावी लागते.

गुप्त गोष्ट उघड केल्यावर स्पष्टता येते.पांपाकडे कानाडोळा न करता कोणताही मुद्दा समोर आणला तर स्पष्ट होतो.

जरी वचनाच्या सत्याद्वारे पापाबद्दल सांगितल्यावर जरी काही काळ तणाव होतो तरी नंतर त्यातून शांतता व एकता राखली जाते.

स्पष्टता म्हणजे आपल्या शंका, भीती व चिंता व्यक्त करणे.अशी कल्पना किंवा विचार करणे अयोग्य आहे की समोरच्या व्यक्तीला सर्व माहित आहे. "इतरांना मी काही सांगितल्याशिवाय त्यांनी मला समजावून घ्यायला पाहिजे" म्हणजे गर्व आहे.अशामध्ये स्पष्टता नसणार.

लक्षात ठेवा भावना हा थोडया वेळ असतात.जास्त वेळ त्या राहू शकत नाहीत.परंतु अशा तात्पुरत्या भावना जर तुंम्ही प्रकट केल्या नाहीत तर त्या भावना तुमच्या जीवनामध्ये कायमच्या घर करतात.

प्रभुने आपल्याला **इब्री १२ ः १५** मध्ये दिलेली ताकीद विसरू नये.

**दिवस ः ६ . . . . . . . . . . . . . . . .वादविवाद करणारी जीभ**

**नितीसूत्रे २० ः ३**

फुट पाडणारे लोक एकतेचा भंग करण्यात आनंद मानतात तर वादविवाद करणारे दुसरयांना कमी लेखण्यात आनंद मानतात. वादविवाद करणे म्हणजे जीभेचा निरूपयोग आहे व लोकांना जिंकण्याचा किंवा प्रभाव पाडण्याचा नक्कीच योग्य मार्ग नाही.

जेंव्हा आपण वादविवाद करतो तेंव्हा आपण शिकु शकत नाही. आपल्याला सुधारण्याची व पुढे जाण्याची संधी मिळत नाही.

आपण निरक्षण करून चर्चा करून व शिकुन अधिक चांगले बनू शकतो. वादविवाद करून नाही.

काही लोकांना वाटते की वादविवाद ही एक सामान्य बाब आहे कारण तें अशा वातावरणात वाढतात.

काहींना वाटते की वादविवाद केल्याने त्यांची किंमत अधिक वाढते.

एक भांडखोर एखादयाची किंमत न करता वाद करत राहतो. वादविवाद करून कोणालाच काही मिळत नाही.

**नितीसूत्रे १७ ः १४**

शलमोन राज्याच्या सल्याकडे लक्ष देऊया.

भांडखोराला उत्तर देण्याचा हा एक मार्ग असू शकतो की " ठीक आहे,ते तुझे मत आहे ."

**मत्तय ५ ः २५**

आपल्या वाद्याबरोबर समेट करायला येशूने सांगितले आहे.

देवाची मुले या नात्याने आपण भांडण न करता असहमतता दाखवायला शिकले पाहिजे. जेंव्हा तारणाचा प्रश्न येतो तेंव्हा एखादया अविश्वसणायाबरोबर आपण सहमत होऊ शकत नाही. आपण संकल्प ठेवून कोमलता राखली पाहिजे.

बेंजामिन फॅकलीन म्हणायचे " हया मुद्दयावर मी सहमत आहे, परंतु जर तुमची काय हरकत नसेल, "मी हा अपवाद मानु का?".

**दिवस ः ७ . . . . . . . . . . . . . . . . . . अभिमानी जीभ.**

**नितीसूत्रे २६ ः २**

अभिमान येतो जेंव्हा आपण परमेश्वराला विसरतो. आपण विचार करतो आपल्या सर्व वस्तू माझ्या आहेत व त्या मी माझ्या कर्तृत्वाने कमावल्या आहेत.

नबुखन्देस्सर राज्याने काय केले पहा.

एके दिवशी आपल्या राजवाडयाच्या छपरांवरून फेरी मरत असताना तो हे म्हणाला व स्वतःबद्दल अभिमान बाळगला.
**(दानिएल ४ ः ३०)**

परमेश्वराने लगेच कार्य केले. राजाला राजसनावरून काढून टाकले. त्याने शेतांमध्ये वस्ती केली. त्याचे केस गरूडाच्या

पिसाप्रमाणे वाढले आणि त्याची नखे पक्ष्यांच्या नखांसारखी झाली . तो मानसिक दृष्टया अस्थिर झाला . परमेश्वरच सर्वांवर राज्य करतो हयाची राजाला जाणीव झाल्यावरच परमेश्वराने त्याचे पुर्वीचे वैभव व राज्य त्याला दिले .

ह्याची साक्ष **दानिएल ४ ः ३४ ते ३५** मध्ये दिली आहे .

अभिमान्यांचे परिणाम कसे असतात ह्याचा पवित्रशास्त्रातून अभ्यास केला तर आपल्याला नम्र होण्यास मदत होईल .

प्रेषित पौलाचे वाक्य पहा "तुला श्रेष्ठत्व कोणी दिलें? आणि जें तुला दिलेली नाही असे तुझ्याजवळ काय आहे ? तुला दिलेले असतां. दिलेले नाही अशी प्रतिष्ठा का मिरवतोस" ? **(१ले करिंथ ४ ः ७)**

परमेश्वराच्या नांवाचे गौरव होण्यासाठीच त्याने आपल्याला वेगवेगळे गुण दिले आहेत .

लक्षात ठेवा की स्तुति एखाद्या अत्तरासारखी असते ज्याचा तुंम्ही थोडा उपयोग करू शकता परंतु जर तुंम्ही ते पिला तर तुंमचा मृत्यू होईल .

**१ ले करिंथ १५ ः १०**

**दिवस ः ८ . . . . . . . . . . . . .स्वतःला नापसंत करणारी जीभ**

**निर्गम ४ ः १०**

जेंव्हा तुंम्ही स्वतःला कमी लेखता तेंव्हा तुंम्ही अन्यायकारक मार्गाने स्वतःची किंमत कमी करता . हा एक अभिमानाचाच प्रकार आहे . सैतान आपल्याला सांगतो की आपला काही उपयोग नाही. आपली काही करण्याची योग्यता नाही . त्यामुळे जीवनातील तुमच्या संधी तुंम्ही गमावता .

स्वतःला कमी लेखणे हे नम्रतेसारखे भासते परंतु वस्तुतः ते म्हणजे विश्वासाला व देवाच्या वचनाला नाकारण्यासारखे आहे .

**(फिली ४ ः १३)** . स्वतःला तुंम्ही काय समजता हे महत्त्वाचे आहे .

**लुक ८ ः ३0** मध्ये एका दुष्टात्मा लागलेल्या व्यक्तीचा स्वभाव येशूने समोर आणला येशू त्याचे नाव विचारले व त्याने " सैन्य " असे सांगितले . " सैन्य " हे त्या व्यक्तीचे नाव नव्हते तर खुप सारे दुष्टात्मे असल्यामुळे ती त्याची ती एक तात्पुरती स्थिती होती . दुःखाची गोष्ट ही आहे की या मनुष्याने अशा तातपुरत्या स्थितीला आपल्या जीवनातील कायमची वस्तुस्थिती बनवली .

काही तातपुरत्या परिस्थितींना आपण जीवनातील कायमची वस्तुस्थिती करण्याची आपण इच्छा धरतो . एकदा तुंम्ही असफल झाले याचा अर्थ हा नाही की तुंम्ही प्रत्येक वेळी असफल होणार . एकदा तुंम्ही पडला म्हणजे नेहमी पडणार असे नाही .

आम्ही देवाच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवला पाहिजे जो आपल्याला जयोत्सवाने नेतो **(२ करिंथ २ ः १४)**

स्वतःला कमी लेखल्याने नाखुष होतो . कारण त्याचा उगम विश्वासातून न होता नकारात्मक भावनेतून होतो .

परमेश्वराचा कोध मोशेवर भडकला जेंव्हा त्याने आपल्याला नीट बोलता येत नाही हे सांगितले . **(निर्गम ४ ः ११ ते १२)**

परमेश्वराशिवाय जरी आपण काहीच करू शकत नाही तरी त्याच्याद्वारे सर्व शक्य आहे . या ह्या गोष्टींवर आपण विश्वास ठेवू सतत मान उंच करून जगू या .

**दिवस ः ९ . . . . . . . . . . . . . . . . . . .निंदा करणारी जीभ .**

**नितीसुत्रे १० ः १८**

निंदा म्हणजे एखाद्या व्यक्तीची किर्ती, चरित्र किंवा चांगले नाव खराब करण्यासाठी त्या व्यक्तीबद्दल मत्सरी खोटी किंवा खरी सुध्दा वाक्य बोलणे . साधारण राजकीय नेते असे बोलतात तरी केवल तेच असे बोलतात असे नाही . मंडळीतही ह्या गोष्टी घडतात . कोणीही निंदा करण्याच्या परीक्षेत पडू शकते .

एका गोष्टीची खात्री आहे की स्वर्गात निंदा करणारे नाहीत . **(स्तोत्रसंहिता १५ ः १ ते ३)**

आठवण करा जेंव्हा तुंम्ही एखादयाचे नाव खराब होईल अशी कुणाची निंदा केली का?आपण असे का केले ?

दियत्रफेस एक नवीन करारातील मंडळीचा प्रमुख ज्याने स्वतःला एका असुरक्षित परिस्थित पाहिले . प्रेषित योहान काही शिक्षकांना ह्या मंडळीत बोलायला सांगितले . आणि दियत्रफेसयास वाटले की त्याच्या प्राबल्याला धमकावले म्हणून त्याने त्यांचा स्वीकार केला नाही . योहानाला हा त्याचा स्वभाव आवडला नाही व त्याने आपला मित्र गायस याला सांगितले की अशा परिस्थितीत तो काय करणार आह . **(३ योहान १ ः १०)**

आपल्या क्षमतेची असुरक्षितता, आपले स्थान गमावण्याची धमकी, सर्वाबरोबर मिसळुन राहण्यास असणारा नम्रतेचा अभाव इ . गोंष्टीमुळे आपण निंदा करतो .

निंदा करणारा व्यक्ती हे सिध्द करतो की त्याने देवाने दिलेले वचन स्वीकारले नाही . जसे...... .

**स्तोत्रसंहिता ७५ ः ६ ते ७**

कोणीही परमेश्वराला सोडून मानवाला उच्च करू शकत नाही .

**यशया १४ ः २७**

कोणीही देवाची योजना बदलू शकत नाही .

परमेश्वर आपल्याला सुरक्षा व पारितोषिक देतो म्हणून जेंव्हा आपण निंदा करतो तेंव्हा आपण परमेश्वराविरूध्द पाप करतो .

**नितीसुत्रे १३ ः ३**

**दिवस ः १० . . . . . . . . . . . . . . . .चुगली करणारी जीभ**

**नितीसुत्रे १८ ः ८**

एक प्रसिध्द वेळ घालवण्याची पध्दत म्हणजे इतरांच्या खाजगी गोष्टींची चुगली करणे . परमेश्वर म्हणतो की ते एका स्वादिष्ट अन्नासारखे आहे . जे एका उंदरे पकडण्यासाठी येणाया पिंजरयात ठेवण्यासारखे आहे जे उंदीर टाळू शकत नाही . आता आपल्याला माहित पडले की इतरांच्या गोष्टींबद्दल बोलण्याचा मोह का टाळता येत नाही .

जेंव्हा आपण गप्पागोष्टी करतो तेंव्हा आपण प्रामाणिक नसतो .

जेंव्हा आपण देवाला आवडणाया गोष्टी करतो तेंव्हा आपण स्वतःला परमेश्वरासारखे चांगले समजतो. त्याने आपल्याला त्याच्या खुशीसाठी बनवले म्हणून जर एखादया बद्दल गप्पा करण्याची आपल्या मनात गोष्ट आली तर विचार करा की आपण हे का करतो ? काय ह्या एकाच मार्गाद्वारे आपण चांगली मैत्री करू शकतो ?

खरे तर इतरांच्या पापाच्या निरूपयोगी बिया आपण बनतो. जर आपण आपल्या जीवनाबद्दल व मिशनबद्दल लक्ष लावू तर आपल्याकडे अशा इतरांच्या निरउपयोगी गोष्टीबद्दल गप्पा करायला वेळ नसणार आहे.

**नितीसुत्रे २० ः १९**

निर्णय करा दूर राहण्याचा सर्वांना समजू दया की गप्पांमध्ये तुंम्ही सहभागी नाही.

इतरांच्या जीवनाबद्दल चर्चा करण्यात आपण व्यस्त होऊ नये.

**स्तोत्रसंहिता १९ ः १४**

**दिवस ः ११ . . . . . . . . . . . . . . . . . . .लुडवुड करणारी जीभ**

**२ रे थेस्सलनी ३ ः ११**

लुडवुड करणे म्हणजे न विचारता इतरांच्या व्यक्तीगत व खाजगी गोष्टीमध्ये पडणे. गप्पांसारखे लुडवुडणे म्हणजे इतरांच्या जीवनात डोकावणे " हे केवढयाला घेतले ?" "तुंम्ही काय बोलत होता ?" " हे कसे काय विकत घेतले ?"

हे विचारणारे प्रत्येकजण लुडवुड करतात असे नाही. काही जण खरच इतरांना मदत करण्यासाठी बोलतात. मग आपल्याला कसे कळणार की आपण योग्य करतो का नाही ? आपण स्वतःच्या अंत ःकरणाला प्रश्न केला पाहिजे की ही माहिती आपण का विचारतो ?

**नितीसुत्रे २९ ः १७**

कुत्रा हया प्रण्याचा कान हा सर्वात संवेदनशील अवयव आहे. जर आपण त्याचा कान धरला तर तो नक्की आपल्याला चावणार अशाप्रकारे इतरांच्या जीवनात नाक खुपसल्यामुळे आपल्याला नकारात्मक प्रतिकिया मिळू शकते.

आता जर आपण पालक किंवा त्यासमान असाल तर तुम्हांला काही वेळा अशी चौकशी करावी लागेल. नकारात्मक प्रतिक्रियेला घाबरू नका. परंतु संवेदनशील व कोमल असा. जी मोठी मुले आहेत आपण शिकण्याचा स्वभाव ठेवला पाहिजे.

**१ ले पेत्र ४ ः १५**

लक्षात ठेवा लुडवुड करणे पाप आहे. परंतु जर तुंम्हाला इतरांच्यात सहभागी व्हायचय तर आपला उद्देश काय आहे तपासा व त्या उद्देशासाठी प्रार्थना करा.

कोणीतरी म्हटले आहे. " जे लोक स्वतःच्या जीवनात व्यस्त असतात ते अधिक सफल होतात कारण त्यांची स्पर्धा कमी असते "

ह्याबद्दल आपण विचार काय आहे ?

**दिवस ः १२ . . . . . . . . . . . . . . . . .विश्वासघातकी जीभ .**

**नितीसुत्रे    ११ ः १३**

विश्वासघात म्हणजे एखादयाला नुकसान होईल अशाप्रकारे त्या व्यक्तीच्या व्यक्तीगत संवेदनशील गोष्टीत त्याची फसवणूक करणे . चहाडी केल्याने एखादयाचे नुकसान न होता तो लज्जीत होतो . परंतु विश्वासघात करणे म्हणजे गुप्त गोष्टी शत्रुसमोर दुरउपयोग करण्यासाठी उघड करणे .

यहुद्याने येशूचा विश्वासघात सहज केला कारण त्याची येण्याची व जाण्याची जागा त्याला माहीत होती . **(योहान १८ ः २)** . येशुच्या जीवनाविषयी व सवयींविषयी बरीचशी माहिती यहुदाला होती व त्याला येशुच्या जीवनामध्ये दखल घेण्याची मुभा होती . व त्याचा शेवट नाशात झाला . एखादयाचा विश्वासघात केल्याने आपली किंमत व प्रामाणिकपणा राहत नाही .

एखादया बरोबर न सोडवलेला वाद आपल्या जीवनात आहे का ? तुंम्ही त्यांचा विश्वासघात केला आहे का ? ह्या पापात तुंम्ही अजुनही आहात का? की तुंम्ही पश्चात्ताप केला आहे ?

दुसरीकडे,तुमचा विश्वासघात कोणी केला आहे का ?तुंम्हाला कसे वाटले ? तुमचा त्या व्यक्तीवर अजूनही राग आहे का ? माफी मागायला व क्षमा करायला शिकणे ह्या ख्रिस्ती जीवनातील आवश्यक गोष्टी आहेत . जर ह्या गोष्टी केल्या नाही तर आपण जीवनात पुढे न जाता गुलामीत राहू .

**रोमकरांस पत्र ८ ः २८**

परमेश्वर सर्व गोष्टी चांगल्यासाठी करतो

आजच निर्णय करा कि तुंम्ही हे एक विश्वासी जीवन जगणार व जर तुमचा विश्वासी मित्र असेल तर त्याबद्दल देवाचे उपकार माना .

**दिवस ः १३ . . . . . . . . . . . . . . . .अमंगळ बोलणारी जीभ**

**इफिस  ४ ः २९**

तुमच्या बरोबर वेळ घालवल्यावर लोकांना स्वतःबद्दल प्रोत्साहन मिळते ? का ते निराश होऊन जातात ?

१ ले थेस्सलनी ५ ः ११

तुंम्हाला असे असुरक्षित वाटते का कि दुसयांना खाली पाडल्यावरच तुंम्हाला स्वतःबद्दल चांगले वाटते?

हाथोडयाचा उपयोग जोदण्यासाठी व तोडण्यासाठी सुध्दा होतो . शब्द सुध्दा असेच इतरांना तोडू शकतात किंवा जोडू शकतात . इतरांना प्रोत्साहन करणा-या गोष्टी व मार्ग शोधून आपण अमंगळ भाषणावर विजय मिळवू शकतो . एक सकारात्मक प्रोत्साहन, हातात हात धरून आणि खुप सारा संवाद इ . गोष्टी चांगले संबंध बांधतात . ऑफिसमध्ये किंवा घरामध्ये असे बोलण्याने परिणाम व निष्ठा वाटते .

आपल्या पति पत्नि किंवा मुलांना सांगा ते तुमच्यासाठी की महत्वाचे आहेत . आपल्या पत्निला सांगा कि तू एकच स्त्री माझ्या जीवनात आहेस . आपल्या पतिचे जबाबदार व्यक्ती म्हणून कौतूक करा . आपल्या मुलांना काहीही काम केल्याबद्दल शाबासकी दया . आपल्या विश्वासू मित्राला धन्यवाद दया .

परमेश्वराचे शब्द आठवा " तू माझ्या नजरेत अमोल्य व उच्च आहेस व मी तुझ्यावर प्रीती करतो ."

**दिवस ः १४ . . . . . . . . . . . . . . . . . .संतापणारी जीभ**

**स्तोत्र १ ः १**

दावीदाचा मोठा भाऊ अलियाब खरच एक तिरसट स्वभावाचा व्यक्ती होता . दावीदाला लढाईला पाठवले होते व परमेश्वराचा अपमान केल्यामुळे तो कोधीत होता . दावीद आपल्या परमेश्वरामध्ये सुरक्षित होता . अलियाब असा नव्हता . आपण **१ ले शमुवेल १७ ः २८** पाहू शकता की कशाप्रकारे त्याने दावीदावर संतापून त्याचा हेतू व आत्मविश्वासाला तुच्छ मानले .

संतापणारा व्यक्ती इतरांच्या हेतूंचा तिरस्कार करू शकतो . हे एक असे विष आहे जे संतापणाया व दुस-याही व्यक्तिवर परिणाम करते . संतापणारा कधीही एकटा नसतो तर त्याच्या आवतीभोवती बरेच लोक असतात . संबंध ह्यामुळे पूर्ण बिघडले जातात . यामुळे काही मित्र मिळू शकतात परंतु मैत्री जास्त खोल नसते . संतापणा-याबरोबर मैत्री करणे आपल्याला घातक स्थितीत नेते .

तर या, आपण दुर्जनांच्या मसलतीत न चालता, पापी जनांच्या मार्गात न चालता, व धर्मनिंदकांच्या बैठकीत न बसता धन्य होऊ या .

**दिवस ः १५ . . . . . . . . . . . . . . . .सर्व माहित असणारी जीभ**

**नितीसुत्रे १२ ः २३**

आपण एक असे व्यक्ती आहात का जे न विचारतो इतरांना सल्ला देता ? तुंम्ही असे व्यक्ती आहात कि तुमचे मत सर्वात चांगले आहे व इतरांनी ते ऐकले पाहिजे असे तुंम्हाला वाटते ? तुंम्ही नेहमी असा शब्द वापरता का ? " तुंम्ही असे किंवा तसे करायला पाहिजे "

**नितीसुत्रे १२ ः २३**

जरी तुंम्हाला वाटले कि सल्ला द्यायला तुंम्ही योग्य व्यक्ती आहात आणि तो सल्ला सर्वात चांगला असला तरी तो संवेदनशीलतेने द्या . स्वतःची स्तुति करून आपण आपले मित्र तोडू शकतो . विवाहित स्त्रियांसाठी ही एक गोष्ट ...पति आपल्या पत्नीमध्ये आईला पाहू शकत नाही .

आपण काय केले पाहिजे ? एखादयाने तुंम्हाला विचारू द्या तरच सल्ला दया . दुसयांच्या मध्ये बोलू नका . हे तुंम्हाला अधिक नम्र व भावनीकरित्या प्रौढ बनवेल .

जर तुंम्हाला अशा प्रकारची व्यक्ती व्हावं असं वाटतं तर तुंम्ही विचार करा की काय तुमचे ज्ञान तुमच्यात असुरक्षितता आणते . ? तुमच्याकडे कोणी लक्ष देत नाही म्हणून इतरांची शाबासकी व इतरांचे ध्यान आकर्षित करता का ?

जेंव्हा तुंम्ही संभाषण करता तेंव्हा तुमचे शब्द साधारण ठेवा, लक्ष देऊन ऐका, इतरांचे मत विचारा आणि चुका दाखवण्याचे टाला . तुमचे व्यक्तीगत संबंध इतरांशी अधिक चांगले होतील .

**दिवस ः १६ . . . . . . . . . . . . . . . . . . . कठोर जीभ**

**नितीसुत्रे   १५ ः १**

असंयम, नैराश्य, अक्षमता, दबाव इ. गोष्टींमुळे आपण कठोर शब्द वापरतो. कठोरतेमुळे सकारात्मक कार्य होत नाही. शलमोन राजा सांगतो की सुज्ञ स्त्रीचे बोलणे दयेचे असते **(नितीसुत्रे  ३१ ः २९)**. इतरांशी दयेने बोलणे हे एक सफलतेचे मुख्य साधन आहे.

असा विचार करा की आपल्याला कठोर बोलण्याचा काही अधिकार नाही. कारण परमेश्वर कठोर नाही व तो आपला पिता आहे व आपण त्याचे अनुकरण केले पाहिजे. जसा परमेश्वर आपल्याला अनुग्रह देतो तोच अनुग्रह आपण इतरांना दिला पाहिजे.

याचा अर्थ असा होत नाही की आपण डोके लपवून समस्या व परिस्थितींचा सामना करायला नकार दिला पाहिजे. काही समस्या सोडवण्याअगोदर आपण प्रार्थना करून योग्य त्याचे शब्द मागितले पाहिजे **(यशया ५५ ः ११)**. कठोरतेमुळे परमेश्वराच्या न्यायत्वेचे कार्य होत नाही.

कठोर शब्द हे न विसरणारे व एखादयाच्या जीवनावर कायमचे परिणाम करणारे असतात.

कठोर शब्दांना बळी पडलेले कितीतरी लोक आज समाजातून बहिष्कृत झाले आहेत. हे त्यांच्या आईवडलांकडून, शिक्षकांकडून, पति पत्निकडून किंवा त्यांच्या नेत्यांकडून दुखावले गेले.

**नितीसुत्रे  १६ ः ३२**

ज्याला लवकर क्रोध येत नाही ते महापराक्रमी व्यक्तीपेक्षा बरा आहे. लक्षात ठेवा तोडलेले परत जोडता येत नाही. शब्द परत घेता येत नाही.

आणि जर कठोरता या तुमच्या चरित्रामधील विशेष गुण असेल तर परमेश्वराकडे जाऊन पवित्र आत्मा व देवाला वचनाद्वारे बदलायचा मार्ग शोधा. दया ही तुमच्या जीभेवर असू द्या.

**दिवस ः १७ . . . . . . . . . . . . . . . . . चातुर्य नसलेली जीभ**

**कलसै  ४ ः ६**

दानिएल व त्याचे तीन मित्र मोठया अडचणीत होते. बाबेलचा राजा नबुखन्देस्सर याने त्यांचा देश जिंकून त्यांना बंदी करून नेले. राज्याने राज्यात सेवा करण्यासाठी काही हुशार व सुंदर लोकांना प्रशिक्षणासाठी निवडले. समस्या ही होती की राज्याचे जे अन्न होते ते ह्या यहुदी भावांना अनुरूप नव्हते.  डानियलाने कोणताही विरोध न करता कशाप्रकारे चातुर्याने ही समस्या सोडवली. **(दानिएल १ ः ८)**

दानिएलाचे खुप संकल्प होते की अशुध्द अन्न जे दरबारात मिळत होते ते खायचे नाही त्याने चातुर्याने विनामद्य,शाकाहारी जेवण मिळवण्याची परवानगी मिळवली.

परमेश्वराने दानिएलला दरबारातील एक मुख्य अधिकारी बनवून त्याला सफलता दिली आणि कायमचे निवारण केले.

चतुराई केल्याने आपल्याला नेहमीच जास्त फायदा होतो .

शिष्य या नात्याने प्रामाणिकपणा हा नेहमी महत्वाचा आहे व त्याच्यामध्ये आपण तडजोड करू शकत नाही . परंतु याचा अर्थ हा नाही की आपण काहीही बोलावे . एक महत्वाचे कौशल्य आपल्याला शिकायचे आहे आणि ते म्हणजे कठीण व अनिश्चित परीस्थिती चातुर्याने हातालणे . कारण काही सत्य हे कूर व वेदनादायी असतात . **(ईयोब ६ ः २५)** . भावनिक क्षमता स्वतःचे स्थान व पुढे जाण्याची इच्छा या सर्वांवर अवलंबून असते की प्रत्येक व्यक्ती सत्याचा सामना करताना किती वेदनेतुन जातात . म्हणून चातुर्य हे वेगवेगळया लोकांवर व परिस्थितीवर अवलंबून आहे .

**योहान १ ः १७**

येशूने अनुग्रह दाखवताना सत्य सांगायचे कधीच सोडले नाही . मुद्दाम चतुराई केली तर ती अधार्मिकता आहे . ती आपण रागाने निराश होऊन किंवा सुड घेण्याच्या भावनेने करतो .

बोलण्याआधी दोनदा विचार करा व पवित्र आत्मा तुंम्हाला मार्गदर्शन करो .

**दिवस ः १८ . . . . . . . . . . . . . . . . . भीती घालणारी जीभ .**

**१ ले शमुवेल १७ ः ४४**

दावीदाला मारणे हे एका केकचा तुकडा कापण्यासाठी आहे . असे गोल्याथला वाटले . म्हणून त्याच्या जीभेतून असे शब्द फुकट निघाले भीती घालणारा व्यक्ती गल्याथासारखा असतो नाव पुकारणे धमकीचे शब्द खालच्या नजरेने पाहणे इ . परंतु दाविदाची प्रतिक्रिया वेगळी होती . दाविदान त्याला भिती घालणाया शत्रुसमोर आपला देवावरचा विश्वास प्रगट केला .

**१ ले शमुवेल १७ ः ४५ ते ४६**

भीती घालवणारे शब्द समोरच्या व्यक्तीला घाबरवण्यासाठी व असूरक्षित करण्यासाठी असतात . ओरडणे हा त्यातील एक प्रकार आहे . जर आपण फक्त परमेश्वराचेच भय धरले तर कोणी आपल्याला भीती घालू शकत नाही .

परमेश्वराने एकमेकांवर दडपण किंवा सत्ता चालवायला कधीच नाही सांगितले . एदेन बागेमध्ये परमेश्वराने आदाम व हवा यांना एकमेकांवर नाही तर मासे पक्षी प्राणी यांच्यावर सत्ता चालवायला सांगितले . **(उत्पत्ती १ ः २८)**

भीतीदायक बोलण्याने एखादयावर घातक शारीरिक व मानसीक परिणाम होऊ शकतो . जसे डोकेदुखी, चिंता, निराशा, निद्रानाश, दाब, थकवा, कमीपणा, खिन्नता इ . अशाप्रकारे त्याच्या लेकरांनी एकमेकांशी वागावे अशी परमेश्वराची इच्छा नाही . भीतीदायक बोलण्याने घरात ऑफिसमध्ये किंवा व्यक्तीगत संबंधात बंडखोरता येते .

जर असे बोलल्याची आपल्याला सवय असेल तर विचार करा की का आपण इतरांवर नियंत्रण ठेवू इच्छिता ? जे अशा नकारात्मक परिस्थितीत वाढले ते अशा परिस्थितीत हरवून गेले . किंवा खोल पाप व सुरक्षितपणा लपवून ठेवणे अशा गोष्टी आपल्या जीवनातून बाहेर काढल्या पाहिजे .

**दिवस ः १९ . . . . . . . . . . . . . . . असभ्य किंवा उदधट जीभ**

**यशया ३५ ः ८**

कल्पना करा की आपल्या रस्त्यांवर सभ्य चालक ! शपथा नाही , शिव्या नाही , ओरडणे नाही , धमकावणे नाही , गैरवर्तन नाही .

एखादा व्यक्ती उदधट का असतो?काय आपल्याकडे जास्त वेळ नाही ?खुप अपेक्षा .ऑफिसमधील साहेब पति पत्नि मुले इतर लोक? बेशिस्त ? टवाल मुले? दररोजच्या जीवनातील दबाव?

संयम दाखवणे फार कमी झाले आहे .बेशिस्त असभ्य संवाद आजकाल सर्वसाधारण झाले आहे .एखादयाशी उद्रधट वागणे त्या व्यक्तीचा संपूर्ण दिवस खराब करू शकते .

सुवर्ण नियम कित्येकदा विसरला जातो .(**लुक ६ ः ३१** ).

कारण इतरांबद्दल विचार करण्यासाठी लोकांकडे पुरेसा वेळ नाही .स्वतःमध्ये लोक फार व्यस्त झाले आहेत .आपण पाहतो की इतर लोकांना त्रास होईल इतक्या मोठयाने लोक मोबाईलवर सार्वजनिक जागेत बोलतात .मंडळीच्या सभेमध्ये मोबाई लवर बोलणे किंवा इतर सभांमध्ये ही असेच वागणे इ .

**१ ले करिंथ १३ ः ४ ते ५**

आपली देवावरची प्रीती व इतरांसमोर त्याला सादर करण्याची इच्छा आपल्या दररोजच्या जीवनावर प्रभाव टाकतात .

जर आपल्याशी कोणी उदधट वागले तर? इतके चांगले पण असु नका की सर्व सहन करा .इतरांना त्यांच्या चुका सांगा परंतु नम्रतेने .आजचा दिवस फारच कष्टात गेला?" असा एक चांगला कोमल प्रश्न आहे .सवय लागली म्हणून एखादयाला उदधट वागू देऊ नका .

आणखी त्यांच्याशी त्यांचेसारखे कठोर वागू नका .

सुड घेणे परमेश्वराकडे आहे .

**दिवस ः २० . . . . . . . . . . . . . . . . . . .न्याय करणारी जीभ**

**मत्तय ७ ः १ ते २**

न्याय करणा-या परूशांचा येशूने चांगलाच समाचार घेतला .येशूच्या प्रत्येक कृतीबद्दल किंवा बोलण्याबद्दल ते ताण निर्माण करत होते .पहा येशूने काय प्रतिक्रिया दिली .

**योहान ८ ः १५ ते १६**

न्याय करणारे लोक इतरांच्या वागण्यातील दोष दाखवण्यात मग्न असतात .फक्त इतर लोक जें करायला पाहिजे ते करीत नाहीत म्हणून आपण आपल्या हेतूंनी त्यांचा कृतींचा न्याय करतो .

आपण एखादया व्यक्तीला हळू रमतगमत चालताना पाहिले तर आपण त्याला आळशी म्हणतो .कारण आपल्याला फक्त आपलेच मार्ग माहित असतात .इतर लोक वेगळे असू शकतात .एखादया विषयाबद्दल जे आपले विचार आहेत तेच त्यांचे विचार असतील असे नाही .अनेकदा न्याय हा अफवेवर अवलंबून असतो .आपण काही ऐकतो व त्यावर न्याय करतो .

**मत्तय ७ ः ३ ते ५**

येशूचा न्याय हा देवाच्या स्तरावर आधारित होता .इतर गोष्टींवर नव्हता .ह्या एका स्तराद्वारेच आपण धार्मिकतेने न्याय

करू शकतो . आपण इतरांचा न्याय चांगल्या पद्धतीने करू जर आपण स्वतः तसे चांगले वागलो . जे देवाच्या स्तराने आपले जीवन जगत नाही त्यांच्यासाठी प्रार्थना करा . त्यांना त्यांच्या वागणूकीबद्दल मदत करण्याच्या व चांगल्या हेतूने सांगा .

**दिवस ः २१ . . . . . . . . . . . . . . . स्वतःमध्ये तल्लीन असलेली जीभ**

**फिलीप्पै २ ः ४**

हामान, परशिया राज्यातील एक अधिकारी स्वतल्लीनतेबद्दल एक कित्ता आहे . **एस्तेर ५ ः ११** असे दिसते की संपुर्ण जग त्याच्याभोवतीच आहे त्याची मोठी संपत्ती, त्याची पुष्कळ मुल, त्याचे मोठे संबध, राज्याकडे असलेले स्थान इ . स्वतःबद्दल बोलायला तो कधीच कंटाळला नाही .

तुंम्ही इतरांशी बोलताना तुमच्या बोलण्याचा विषय काय असतो?

तुंम्हाला कसे वाटेल जर एखादा व्यक्ती नेहमी स्वतःच्या समस्सेबद्दलच बोलतो . स्वतःबद्दल नेहमी बोलणाया व्यक्तींशी जवळीक म्हणजे साळींदरला (काटेरी प्राणी) मीठी मारण्यासारखे आहे .

कधीकधी आपल्या सहभागीतेमध्ये गप्पा मारण्यासाठी आपण अतिमहत्त्वाच्या व्यक्तीला शोधतो . असे केले तर आपले लक्ष इकडे तिकडे जाते . आपण पुर्ण लक्ष लावून सहभागिता केली तर ती अधिक सुंदर व अर्थपुर्ण होईल .

जर स्वतःबद्दल सतत बोलणाया व्यक्तीला आपल्याला शिकवायचे असेल तर ते संयमाने करा कारण त्यांना बदलायला वेळ लागतो . जर तुंम्ही असे असाल तर स्वर्गीय मेंढपाळाकडे मदत मागा तर तुमची गरज पुर्ण होईल . इतरांशी खोल संबंध वाढवण्यासाठी प्रयत्न करा .

**दिवस ः २२ . . . . . . . . . . . . . . . . शाप देणारी जीभ**

**याकोब ३ ः १०**

काय तुंम्ही हा विचार केला की प्रशंसा न करणारे शब्द आपल्या मुखातून का निघतात किंवा जिभेच्या टोकापर्यंत का येतात? झसे एकाने सांगितले की वाईट शब्द वापरतो "कारण ते पवित्रशास्त्रात आहेत" . जर असे आपण आहात तर आपण पवित्र आत्माला तुमच्या जीभेवर ताबा ठेवून देत नाही .

**याकोब ३ ः ८ ते ९**

अनादरयुक्त, अश्लील किंवा अशिष्ट शब्द वापरणे देवाच्या लेकराला शोभत नाही . आपला राग किंवा संताप व्यक्त करण्यासाठी लोक भ्रष्ट व अप्रशंसनीय शब्द वापरतात कारण त्यांना वाटते धार्मिक शब्द परिणामकारक नाहीत . वाईट शब्द तुंम्ही हळू आवाजात वापरता का? आपली टाच आदळणे , किंमती वस्तू तोडणे, पुस्तंकांचा ढीग पाडणे पाणी फेकणे जाळपोळ किंवा प्रसंगी दोन हात करणे ? वाईट शब्द बाहेर पडला नसला तर तो नक्कीच जीभेच्या टोकावर आहे .

**लुक ६ ः ४५**

जीभेवरून शब्द जरी बाहेर पडले नाहीत तरी ते अंतःकरणातून बाहेर पडतील . अशा दृष्टतेवर ताबा मिळवण्यासाठी

आपण प्रार्थना व उपवास करून परमेश्वराकडे गेले पाहिजे.

लक्षात ठेवा शब्द हे तोंडी विचार आहेत. ते अपघाती येत नाहीत तर आपणच त्यांचे पालनपोषण करतो.

**दिवस ः २३ . . . . . . . . . . . . . . . . . . . कुरकुर करणारी जीभ**

**स्तोत्रसंहिता १४२ ः १ ते २**

सलाफहादाच्या पाच कन्यांना समस्या होती. इस्त्राएल लोक वचनरूपी देशात पोहचण्या अगोदर त्यांचा पिता मृत्यू पावला. सलाफहाला जमिनीवर हक्क चालवण्यासाठी मुलगा नव्हता व नियमशास्त्राप्रमाणे मुलीला तो हक्क मिळत नव्हता. म्हणून या बहिंनीना पिता भाऊ पति मुलगा किंवा कोणीही पुरूष त्यांच्या कुटुबात नसल्यामुळे त्या अडचणीत सापडल्या. त्यांनी काय केले? त्यांनी परमेश्वराबद्दल मोशे बद्दल व नियमशास्त्राबद्दल सगळीकडे कुरकुर केली **(गणना २७)**. नाही! त्या योग्य व्यक्तीकडे गेल्या व त्यांची समस्या सांगितली व मोशेने ही अडचण परमेश्वराकडे नेली व त्यांना योग्य उत्तर दिले.

जर त्यांनी मोशेविरूध्द व व्यवस्थेबद्दल तक्रार केली असती तर कदाचित त्यांना आपला जीव गमवावा लागला असता.

कोणत्याही समस्येला सोडवले जाऊ शकते जर ती योग्य व्यक्तीकडे नेली, ज्याला अधिकार आहे. अनेक लोक असे न करता ते सगळीकडे जाऊन बोलतात व गरज नसताना इतर लोकांना त्यात सहभागी करतात. ही एक अधार्मिक गोष्ट आहे. सुरूवातीला वचनामध्ये स्तोत्रकर्ता आपली समस्या योग्य व्यक्तीकडे नेतो जो ती सोडवू शकतो व तो म्हणजे परमेश्वर.

तुंम्ही एकटे पडू नये म्हणून अशा कुरकुर करणाया लोकांमध्ये सहभागी होता का? जसे काही बायका एकत्र बसून आपल्या नवयांबद्दल कुरकुर करतात? किंवा नवरे असे करतात? कुरकुर करणाया व्यक्तीबद्दल आपल्या दोन जबाबदाया आहेत. एक त्या व्यक्तीची समस्या सोडवणे व दुसरे म्हणजे त्या व्यक्तीला नाण्याची दुसरी बाजू पाहायला मदत करणे.

**दिवस ः २४ . . . . . . . . . . . . . बदला घेणारी जीभ**

**१ ले पेत्र ३ ः ९**

तोंडाने बदला घेणे खुपच सोपे आहे. त्याचा आनंद काही काळ नक्कीच मिळतो परंतु त्यामुळे होणारा पसतावा बराच काळ सोसावा लागतो. सैतान आपल्यासमोर नेहमी बदला घेण्याची संधी निर्माण करतो.

बदला घेण्याचा मुल अर्थ आहे “शिक्षेचा मोबदला.”

**रोम १२ ः १७ ते १९**

जर मी बदला घेत असेल तर मी पवित्र आत्माचा दुर्लक्ष करत आहे जो परमेश्वराच्या शिस्तीला अधिक राहयला सांगतो व मी प्रभुच्या अधिकारा विरूध्द बंड करतो.

जर आपण हा विचार केला की माझ्या परिस्थितीत येशू असता तर त्याने काय केले असते. तर ह्या पापावर आपण विजय मिळवू शकतो. आपल्याला ख्रिस्ताचे अनुकरण करण्यासाठी बोलावले आहे म्हणून आपण त्याच्या पावलावर पाऊल ठेवू व त्याचे सारखे अधिक वाढूया.

**दिवस ः २५ . . . . . . . . . . . . . . . . .आरोप लावणारी जीभ**

**प्रकटीकरण १२ ः १०**

ईयोबच्या बाजूने काहीही घडले नव्हते . त्याने आपली मुले संपत्ती आणि आरोग्य गमावले . त्याच्यात अधिक भर घालण्यासाठी त्याच्या मित्रांनी त्याच्यावर घमंडी हेवा व इतर चरित्राबद्दल आरोप केले (**ईयोब २२**) . ते त्याचे सांत्वन करायला आले होते तरी त्याच्या दुखाचे व पराभवाचे कारण त्यांना शोधायचे होते . ईयोबाला माहित होते तो पुर्ण प्रामाणिकपणे चालला . हे खोटे आरोप सहन करायला त्याला फार भयानक होते .

एखादयाचा अपराध सिध्द होण्याअगोदर कधी तुंम्ही कोणावर आरोप केले का? झर तुंम्ही असे करता तर तुंम्ही सैतानासारखेच करता जो देवाच्या मुलांवर आरोप लावणारा मुख्य व्यक्ती आहे . पहा परमेश्वराने आदाम व हवेला कशाप्रकारे समोर आणले जेंव्हा त्यांनी स्वइच्छेने आज्ञा मोडली . परमेश्वराने असे सहज म्हणले असते " तुंम्ही कृतघ्न पापी लोकांनी माझी आज्ञा मोडण्याचे धाडस कसे केले? माझ्या बागेमध्ये मी तुमच्यावर विश्वास नाही ठेवायला पाहिजे होता . "

**उत्पत्ती ३ ः ९ ते ११**

परमेश्वराला माहित होते की ते लोक काय उत्तर देणारे आहेत . तरी परमेश्वराने आदामाला स्पष्टीकरण देण्याची संधी दिली .

खुलासा करणारे प्रश्न विचारून व प्रतिकिया ऐकून घेणे म्हणजे परमेश्वरावर सोपवणे . जर आरोपांमुळे एखादयावर काही परिणाम झाला असेल तर तुंम्ही त्याला सांगा की ते सत्य नाही . आपली शक्ती खोटे बोलण्यामध्ये वाया घालवू नका कारण सर्व लबाडीची सुरवात सैतानाकडून होते .

परमेश्वर तुमचा समर्थक आहे व तो नेहमी चांगले कार्य करील .

**दिवस ः २६ . . . . . . . . . . . . . . . . .निराश करणारी जीभ .**

**ईयोब २९ ः २४**

खुप सा-या लोकांना आपल्याला जीवनातील उद्देश्यापर्यंत पोहचता आले नाही कारण त्यांच्याबद्दल कोणीतरी निराशाजनक शब्द वापरले . चांगले गुण न मिळवणाया विद्यार्थांची स्वप्ने त्यांच्या शिक्षकांनी उध्दवस्त केली . कुटुबांनी त्यांना त्यांच्या महत्वकांक्षांपासून परावृत्त केले . किंवा त्यांच्या वरिष्ठांकडून निराशा मिळते .

एखादयाचा योजनेबद्दल आक्षेप घेऊन काय आपण कधी त्यांच्या आशा आत्मविश्वास व जोश घालवलात का? असे घडते कारण आपल्या कल्पनांपेक्षा परमेश्वर महान कार्य करू शकतो असा आपला विश्वास कमी असतो . (**इफिस ३ ः २०**)

कशाप्रकारे निराशाजनक बातमीने इस्त्राएल लोकांमध्ये संकटजनक दुःख आणले . ज्यावेळेस ते वचन दिलेल्या देशात पोहचणार होते तेंव्हा मोशेने बारा जनांना तो देश हेरण्यासाठी पाठवले . त्यांनी तेथे मोठी समृध्दता पाहिली .

दोघांनी द्राक्षांचा पुंजका पाहिला . त्यांनी काही अडचणी व धिप्पाड लोकांनाही पाहिले . परत येऊन कालेब व यहोशवाने इस्त्राएल लोकांना पुढे होऊन तो देश काबीज करण्यासाठी प्रोत्साहन केले परंतु इतर दहा जण त्याबद्दल जोशिले नव्हते .

**गणना १३ ः ३१ ते ३३**

परमेश्वराचे सर्व प्रयत्न व चमत्कार पाहूनसुध्दा अनेक लोकांनी निराशा करणाया बातमीवर विश्वास ठेवला(**गणना १४ ः ३६ ते ३८)** . इतकेच नाही तर परमेश्वराने संपूर्ण इस्त्राएल लोकांना ४0 वर्षे रानात भटकवले . जर दहा जनांनी सर्वांना प्रोत्साहन केले असते तर कदाचित वेगले घडले असते .

याचा अर्थ हा नाही की दिवसा स्वप्न पाहाणा-याच्या योजनेबद्दल आपण प्रश्न नाही केला पाहिजे . परंतु विचार करा की तुंम्हाला प्रोत्साहन केल्यावर तुमच्यात कशी एक जादुई बदल होतो .

ह्या नकारात्मक जगामध्ये प्रत्येकाला प्रत्येक वेळी प्रोत्साहनाची गरज असते . जर तुंम्हाला कोणी निराश करत असेल तर आपली ही जबाबदारी आहे की सांगायची तुमचे लक्ष परमेश्वराकडे आहे .

**दिवस ः २७ . . . . . . . . . . . . . . . . शंका घेणारी जीभ**

**मार्क ११ ः २३**

इतरांच्या समस्येबाबत आपण खुप आत्मविश्वास दाखवतो परंतु आपल्याबाबतीत काय घडले तर आपण स्वतःवर राग व्यक्त करतो . प्रत्येकाला आपण विश्वास देतो की " सर्व काही ठिक होईल . " परंतु स्वतःला तसे म्हणणे सोपे नाही .

झर शंका घेणाया जिभेवर आपल्याला ताबा मिळवायचा असेल तर आपल्याला परमेश्वरानी दिलेली वचने माहित पाहिजे .

केवल तेच नाही तर आपल्या तोंडानी ती घोषित करणे . विश्वास ऐकण्याने येतो **(रोम १0 ः १७ )** . जितके जास्त आपण अविश्वासाबद्दल बोलणार तितका विश्वास कमी होतो . पण जितका जास्त विश्वास आपण प्रगट करणार तितका आपल्या विश्वास जास्त वाढणार .

अविश्वास अंतःकरणातून शंका बाहेर येतात . शंकांचे मुल आपल्या स्वतःवरील अति विश्वास आहे .

**नितीसुत्रे २८ ः २९**

हे वचन सांगते जो स्वतःवर भरवसा ठेवतो तो मुर्ख आहे . जर तुमच्या जीवनातील काही गोंष्टीबद्दल तुम्हाला शंका असतील तर वचनात जा . देवाने दिलेली वचने शोधा जे शंकांना दूर करू शकतात . वाचा पाठांतर करा पुन्हा पुन्हा उच्चार करा जेणे करून ती वचने तुमचा संकल्प बनतील .

देवाची लेकरे त्याच्यावरील विश्वासाने जगतात . शंका घेणाया थोमासारखे होऊ नका ज्याने केवल डोळयाने पाहून व स्पर्श करून विश्वास ठेवला . **(योहान २0 ः २५ )** . अशाने परमेश्वर प्रसन्न होत नाही .

**दिवस ः २८ . . . . . . . . . . . . . . . . . . . वाचाल जीभ**

**नितीसुत्रे १0 ः १९**

तोंडाचा अतिसार झालेला व्यक्ती आपल्याला माहित आहे का? बडबड पुढे जात राहते एका विषयावरून दुसया विषयापर्यंत अशा जीभेला वाचाल किंवा बडबड करणारी जीभ म्हणतात . असे म्हणतात कि जास्त करून स्त्रियांना अशी सवय असते परंतु काही पुरूष पण असे असतात .

याचा अर्थ हा नाही सर्वांनी गप बसावे परंतु शांत राहण्यास शिकावे .

**१ ले थेसलनी** ४ ः ११

जर इतरांचे लक्ष वेधून बोलण्याचा गुण असेल परमेश्वराविषयी व वचनांविषयी बोला . त्यामुळे काही लोक धार्मिकततेकडे वळतील .

खदाचित तुंम्ही जास्त न बोलणारे असाल परंतु तु देवाविषयी अधिक बोलण्यास तुंम्ही शिकले पाहिजे .

**दिवस ः २९ . . . . . . . . . . . . . . . . . असंमजस जीभ .**

**नितीसुत्रे २ ः ११**

मोठया पुराने पृथ्वीच्या बहुतेक भागाचा नाश झाल्यावर नोहाने द्राक्षमला लावला . एकदा तो द्राक्षरस पिऊन तो नग्न अवस्थेत पडला . जेंव्हा नोहाचा मुलगा हाम ह्याने त्याला पाहिले तेंव्हा त्याने जाऊन आपल्या दोन भावांना ते सांगितले **(उत्पत्ती ९ ः २२ )** . इतर मुले शेम व हाफेथ यांनी कपडे घेतले व पाठमुरे जाऊन नोहाची नग्नता झाकली . त्यांनी नोहाकडे पाहिले नाही . त्यांचे हे कृत्ये त्यांचा समंजसपणा दाखवतो .

समंजस मनुष्य आपल्या बोलण्यात व वागण्यात शहानपण व स्वतःवरचे निर्बंध दाखवतो .

हाम ला त्याच्या असंमजसपणाची किंमत चुकवावी लागली . नोहाला नंतर हामबद्दल समजले व त्याने त्याला शाप दिला .

इतरांच्या गुप्त गोष्टी ज्या आपल्याला समजल्या त्या इतरांना सांगण्यात समंजसपणा नाही . याउलट आपण त्याबद्दल कृती करायला हवी .

मंडळी मध्ये आपले जवळचे संबंध असतात . त्यामुळे काही वेळा लिडरबद्दल किंवा इतर शिंष्याच्या काही गोष्टी आपल्याला माहिती होऊ शकतात . त्यामागे परमेश्वराचा काही उद्देश असतो . नाथानने जे केले ते तुंम्ही करावे अशी त्याची इच्छा असते . **(२ रे शमुवेल १२ )** सर्वांसमोर एखाद्याने पाप सांगण्याने ख्रिस्ताच्या मंडळीचे नुकसान होते .

जर लीडर चुकत असेल तर परमेश्वर त्याला शिक्षा करेल कारण त्याने त्याला निवडले आहे .

**दिवस ः ३0 . . . . . . . . . . . . . . . निःशब्द जीभ चूपचाप असणारी**

**उपदेशक ३ ः १ ते ७**

आजपर्यंतचे सर्व अध्याय वाचल्यावर आपल्याला वाटत असेल माझ्या जीभेवर ताबा ठेवण्यासाठी मला कमी शब्द वापरले पाहिजेत . संबंध टिकवण्यासाठी बोलणे अत्यंत जरूरी आहे .

जसे ऑक्सीजनचे कार्य आपल्या शरीरात आहे तसे कार्य चांगला संवाद आपल्या संबंधात करतो . आजपर्यंतच्या अध्यायामध्ये आपण पाहिले की वेगवेगळया प्रकारच्या नकारात्मक बोलण्याने काही किंमत नाही . तसेच चुकीच्या पध्दतीने गप राहण्याला पण काही किंमत नाही .

गप राहणे बदला घेण्यासारखे आहे . आपण संताप किंवा नापसंती व्यक्त केली पाहिजे . गप्प राहणे त्यावर उपाय नाही तर समोरासमोर बोलणे . **मत्तय १८ ः १५** पहा .

जेंव्हा बोलले पाहिजे त्यावेळेस जर गप राहिलं तर नकारात्मक भावना आपल्यामध्ये वाढते . त्या व्यक्तीविषयी ज्याच्याबरोबर आपला काही वाद आहे . आपल्याशी वाद घालणारा आपल्याशी भांडून आपल्याला दुःख देऊ शकतो .

जर एखाद्याला आपण निंदा किंवा टीका करताना पाहताना पाहिले तर गप्प राहणे योग्य नाही . आपले संवंध बिघडतील या भीतीने आपण काहीही ऐकूण घेणे अयोग्य आहे .

एखादयाला खडयात पडताना आपण पाहिले आणि आपण गप राहिलो आणि त्याला वाचवण्यासाठी तुंम्ही काहीच बोलला नाही तर ते अयोग्य आहे .

गप्प राहणे कधी कधी संमती देण्यासारखे आहे **(गणना ३० ः ३ ते ५ )**

एक जपानी म्हण आहे " शांत कीडे भींतीमध्ये छेद पाडतात" बोलायचे असताना गप राहणे आपल्या संबंधांना छेद देण्यासारखे आहे .

**तुमचे व्यक्तीगत निरीक्षण व निर्णय .**

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**दररोज आपल्या जिभेवर नियंत्रण करताना लक्षात ठेवण्याच्या गोष्टी**

१ . काय मी लबाडी केली आहे का?

२ .काय मी कोणाची खोटी स्तुति केली का?

३ . माझ्या फायदयासाठी काय मी एखादयाबरोबर चालाकी केली का?

४ . काय मी उतावळेपणने बोललो का?

५ .माझ्या शब्दांनी मी फुट पाडली का?

६ . काय मी वादविवाद व भांडण केले का?

७ .काय मी गर्व किंवा घमंड केला?

८ .काय मी स्वतःला कमी लेखले का?

९ . काय आज मी कुणाची निंदा केली?

१० . काय मी चहाडी केली?

११ . काय मी इतरांच्या लुडबुड केली का?

१२. काय मी कुणाचा विश्वासघात केला का ?

१३. काय मी कोणाबद्दल अमंगळ बोललो ?

१४. काय मी संताप केला का ?

१५. मला सर्व माहिती असल्यासारखे बोललो का ?

१६. काय मी कठोर शब्द वापरले का ?

१७. माझ्या बोलण्यात चातुर्य होते का ?

१८. काय माझे शब्द भीती घालणारे होते ?

१९. काय मी कठोर वागलो ?

२०. काय मी कोणाचा न्याय केला ?

२१. काय मी स्वतःमध्ये तल्लीन होतो ?

२२. काय मी कुणाचा तिरस्कार केला ?

२३. काय मी कुणाबद्दल तक्रार केली ?

२४. काय मी कुणाचा सुड घेतला ?

२५. काय मी कुणावर आरोप केले ?

२६. काय मी कुणाला निराश केले ?

२७. काय मी अविश्वास व शंका प्रगट केल्या ?

२८. काय मी जास्त बोलले ?

२९. काय मी असंमजसपणे बोललो ?

३०. काय मी बोलायचे असताना गप्प राहिलो ?